**सं.फौ.ख.क्र. २२५/२०१२**
नितीन वि. अजिनाथ
निशाणी क्र. १०७

**दिनांक २३/०१/२०२५**

**शपथेवर उर्वरित उलटतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. आर. कदम यांच्यामार्फत सुरु –**

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, सन २०१२ पूर्वीचे बँकेतील घडामोडीबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, बँकेतील प्रत्येक रेकॉर्डची रजिस्टरला नोंद ठेवली जाते. हे म्हणणे खरे आहे की, बँकेतील त्या रेकॉर्डचा चार्ज संबंधीत कर्मचा–याकडे दिला जातो. हे म्हणणे खरे आहे की, बँकेतील मुळ अभिलेख कोणी मागणी केली असल्यास त्याबाबतचा शेरा रजिस्टरमध्ये घेतला जातो. हे म्हणणे खरे आहे की, मागणीप्रमाणे जर मुळ अभिलेख कोणाच्या ताब्यात दिला असल्यास त्याची नोंद रजिस्टरला घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात दाखल केलेले बँकेचे मुळ रेकॉर्ड मला बँकेने माझ्या ताब्यात दिले असे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, बँकेच्या संचालक मंडळाने बँकेचे मुळ रेकॉर्ड न्यायालयात दाखल करण्याचे अधिकार दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, संचालक मंडळाच्या आणि बँकेतील वरिष्ठ अधिकारा–यांच्या संमत्तीशिवाय, केवळ आरोपीला मदत व्हावी म्हणून बँकेचे मुळ रेकॉर्ड न्यायालयात दाखल केले आहे.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, सन २००८ साली बँकेमध्ये काम करणारे कर्मचारी आजही हयात आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी १०८ ते ११४ वर आरोपींच्या सह्या आरोपीने माझ्या समक्ष केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने सह्या माझ्या समक्ष केल्या नसल्यामुळे आरोपीच्या सह्याबाबत मला व्यक्तीशः ज्ञान नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या व्यक्तीच्या एकापेक्षा जास्त प्रकारच्या सह्या असू शकतात. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या व्यक्तीच्या

बँकेतील सह्या आणि बाहेरील व्यवहाराच्या सह्या वेगवेगळया असू शकतात. हे म्हणणे खरे आहे की, माझा हस्ताक्षर तज्ञाचा कोर्स झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आजीनाथ गाढवे कोणकोणत्या प्रकारच्या सह्या करतो याची वैयक्तीक माहिती मला नाही.

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, नि. १०८ व ११५ वरील सह्या आरोपीच्या नाहीत याची वैयक्तीक माहिती मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि. ३० वरील सही आरोपीची नाही याची वैयक्तीक माहिती मला नाही.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या धनोदश वटविण्याकारीता आमच्या बँकेत आल्यानंतर त्या खात्यामध्ये पूरेशी रक्कम आहे किंवा नाही याची खात्री बँक कर्मचारी करतात. हे म्हणणे खरे आहे की, त्या खात्यामध्ये पुरेशी रक्कम नसल्यास 'फंड्स इनसफीशिएंट' असा शेरा लिहून तो धनादे शपरत पाठवितो. हे म्हणणे खरे आहे की, खात्यादाराच्या खात्यात पुरेशी रक्कम असल्यास आमचे कर्मचारी धनादेशावरील सही आणि बँकेमध्ये त्या खातेदाराच्या असलेल्या सह्यांचे नमुने यांची पडताळी करतात. हे म्हणणे खरे आहे की, मी बँकेतील उपलब्ध अभिलेखाप्रमाणे घेतलेल्या माहितीप्रमाणे वादग्रस्त नि. ३० जेव्हा बँकेकडे वटविण्यासाठी आला त्यावेळी आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या खात्यात पुरेशी रककम नसल्यामुळे बँकेने 'फंड्स इनसफीशिएंट' या शे–यासह धनादेश परत पाठविला.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ११० वरील तथाकथीत ग्रामविकास अधिकारी आणि आरोपी यांनी त्यांच्या सह्या माझ्यासमक्ष केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी नेमके कोण ग्रामसेवक कार्यरत होते त्यांचे नाव व पत्ता मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ११० चा

दाखला नेमक्या कोणत्या कारणासाठी दिला आणि दाखल्यातील मजकूराची वैयक्तीक माहिती मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी नेमके कोण तलाठी कार्यरत होते त्यांचे नाव व पत्ता मला माहिती नाही.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी १११ वरील तथाकथीत तलाठी आणि आरोपी यांनी त्यांच्या सह्या माझ्यासमक्ष केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे त्यामुळे निशाणी १११ वरील सह्या कोणाच्या आहेत याची वैयक्तीक माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष

सही/-

दिनांक -२३.०१.२०२५.

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आटपाडी.